# मुंबई विद्यापीठ

**No. Aff./ICC/ (2021-22)/31 / of 2021**

## परिपत्रक:

**विषय:— कायम विनाअनुदानित / विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारित ना—हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.**

संदर्भ:— सहसचिव, उच्च व तंत्र शिक्षण, महाराष्ट्र शासन यांचे क्र.बीएड/४६२१/ प्र.क्र.१९९/ मशि—२, दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत कायम विनाअनुदानित / विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविद्यालयांचे प्राचार्य यांना सदर परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शिफारस केलेल्या, तसेच काही अटींच्या अधिन राहुन शिफारस केलेल्या राज्यातील कायम विना अनुदानित / विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना खालील अटींच्या अधिन राहून शैक्षणिक वर्ष २०२१—२२ करिता राज्य शासनाचे, ना—हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

(क) ज्या महाविद्यालयास राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/भारतीय पुनर्वास परिषद यांनी शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे, शासनाने सदर अभ्यासक्रमांस यापुर्वी ना—हरकत प्रमाणपत्र दिले आहे, मा. उच्च / मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार यापूर्वी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट केले आहे व सद्यस्थितीत सुरू आहेत, तसेच संबंधित विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२१—२२ साठी संलग्नीकरण दिलेले आहे, याची खातरजमा संचालक, उच्च शिक्षण यांनी प्रवेश प्रक्रियेकरिता महाविद्यालयांची नोंदणी करताना करावी.

(ख) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/ भारतीय पुनर्वास परिषदेच्या नियामाप्रमाणे सदर अभ्यासक्रमांचे विहित दिवस पूर्ण होतील याची खात्री करून विद्यापीठाने संलग्निकरण प्रदान करावे.

(ग) अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत बी. एड/ एम. एड./ बी.ए. बी. एड. बी. एस्सी. बी. एड./ बी. एड.–एम. एड. /बी. पी.एड. / एम. पी. एड. या अभ्यासक्रमांस प्रवेश देताना अल्पसंख्याक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र. अशैसं–२०१२/प्र.क्र. २१/ कार्या–५ दिनांक २३.०५.२०१३ च्या भाग– अ मधील क्र. १० (ब) व (क) मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार अल्पसंख्यांक /बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे कटाक्षाने अनुपालन करणे बंधनकारक राहील. अन्यथा भाग–ब मधील क्र. ७ नुसार कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण हे सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करतील.

(घ) सर्व विभागीय सहसंचालकांना शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविद्यालयांच्या तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची व राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/ भारतीय पुनर्वास परिषदेने विहित केलेल्या सुधारित निकषांची पूर्तता करण्यात आल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

(ड) ज्या महाविद्यालयांकडून सदर त्रुटींची व सुधारित निकषांची पूर्तता करण्यात येणार नाही, त्या महाविद्यालयांची नावे राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/भारतीय पुनर्वास परिषदेला कळविण्यात यावी. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२२–२३ च्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास राज्य शासनाचे ना–हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, ही बाब संबंधित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

(च) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/भारतीय पुनर्वास परिषदेच्या सुधारित निकषांची पूर्तता न केल्याच्या कारणास्तव राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/ भारतीय पुनर्वास परिषदेने महाविद्यालयाची मान्यता रद्द केल्यास, राज्य शासनाचे ना–हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

मुंबई–४०० ०३२ (सुधिर पुराणिक)
29 डिसेबर, २०२१ कुलसचिव

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत कायम विनाअनुदानित / विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविद्यालयांचे प्राचार्य

UNIVERSITY
IS/ICD/EOD/20 /-
0 8 DEC 2021
16264
OF MUMBAI

PA to R

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन

## उच्च व तंत्र शिक्षण विभाग

४ था मजला, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दुरध्वनी क्र. -०२२-२२७९३१७१ ई-मेल –amol.ugalmugale@gov.in

---

क्रमांक : बीएड ४६२१/प्र.क्र.१९९/मशि-२, दिनांक:२२ नोव्हेंबर, २०२१

DR(CAD)

प्रति,

कुलसचिव,
सर्व अकृषि विद्यापीठे,
महाराष्ट्र राज्य.

Registrar

विषय :- कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांस शासनाचे सुधारीत ना-हरकत प्रमाणपत्र देण्याबाबत.

संदर्भ:- (१) शासनपत्र क्रमांक :बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२, दि.११.०७.२०१६.
(२)शासनपत्र क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२, दि.२७.०७.२०१७.
(३) शासनपत्र क्रमांक:बीएड-४६१५/प्र.क्र.३३२(३)/मशि-२ दि.१२.०७.२०१८.
(४) शासनपत्र क्रमांक:बीएड-४६१९/प्र.क्र.१२१(१)/मशि-२ दि.१२.०७.२०१९.
(५) शासनपत्र क्रमांक बीएड-४६२०/प्र.क्र. ९१(२)/मशि-२, दि. २१.१०.२०२०.
(६) संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे पत्र क्र.बी.एड-२५२१/प्र.क्र.५१/ सीईटीसेल/११००२, दि. ११/१०/२०२१.

महोदय,

उपरोक्त विषयासंबंधीच्या संदर्भाधीन क्रमांक ६ येथील पत्रान्वये, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी शिफारस केलेल्या, तसेच काही अटींच्या अधिन राहून शिफारस केलेल्या राज्यातील कायम विनाअनुदानित/ विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमांच्या महाविद्यालयांना खालील अटींच्या अधीन राहून शैक्षणिक वर्ष २०२१-२२ करिता राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे :-

(क) ज्या महाविद्यालयास राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद/ भारतीय पुनर्वास परिषद यांनी शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण अभ्यासक्रमास मान्यता दिली आहे, शासनाने सदर अभ्यासक्रमांस यापूर्वी ना-हरकत प्रमाणपत्र दिले आहे, मा. उच्च / मा. सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार यापूर्वी केंद्रीय प्रवेश प्रक्रियेमध्ये समाविष्ट केले आहे व सद्यस्थितीत सुरु आहेत, तसेच संबंधित विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०२१-२२ साठी संलग्निकरण दिलेले

आहे, याची खातरजमा संचालक, उच्च शिक्षण यांनी प्रवेश प्रक्रियेकरिता महाविद्यालयांची नोंदणी करताना करावी.

(ख) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद / भारतीय पुनर्वास परिषदेच्या नियमाप्रमाणे सदर अभ्यासक्रमांचे विहित दिवस पूर्ण होतील याची खात्री करुन विद्यापीठाने संलग्निकरण प्रदान करावे.

(ग) अल्पसंख्यांक महाविद्यालयांच्या बाबतीत बी.एड/ एम.एड/ बी.ए.बी.एड-बी.एस.सी. बी.एड / बी.एड-एम.एड/ बी.पी.एड./ एम.पी.एड. या अभ्यासक्रमांस प्रवेश देताना अल्पसंख्यांक विकास विभागाच्या शासन निर्णय क्र.अशैसं-२०१२/प्र.क्र.२१/कार्या-५, दि.२३.०५.२०१३ च्या भाग-अ मधील क्र.१० (ब) व (क) मध्ये विहित केलेल्या तरतुदीनुसार अल्पसंख्यांक/बिगर अल्पसंख्यांक कोटयाचे कटाक्षाने अनुपालन करणे बंधनकारक राहील. अन्यथा भाग-ब मधील क्र.७ नुसार कारवाई करण्यासाठी शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे व संबंधित सहसंचालक, उच्च शिक्षण हे सक्षम प्राधिकरणाकडे शिफारस करण्याची कार्यवाही करतील.

(घ) सर्व विभागीय सहसंचालकांना शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविद्यालयांच्या तपासणी दरम्यान निदर्शनास आलेल्या त्रुटींची व राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद / भारतीय पुनर्वास परिषदेने विहित केलेल्या सुधारित निकषांची पूर्तता करण्यात आल्याची खातरजमा करण्याची जबाबदारी विद्यापीठाची राहील.

(ङ) ज्या महाविद्यालयांकडून सदर त्रुटींची व सुधारित निकषांची पूर्तता करण्यात येणार नाही, त्या महाविद्यालयांची नावे राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद / भारतीय पुनर्वास परिषदेला कळविण्यात यावी. तसेच, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ च्या प्रवेश प्रक्रियेत सहभागी होण्यास राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र देण्यात येणार नाही, ही बाब संबंधित महाविद्यालयांच्या निदर्शनास आणण्यात यावी.

(च) राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद / भारतीय पुनर्वास परिषदेच्या सुधारित निकषांची पूर्तता न केल्याच्या कारणास्तव राष्ट्रीय अध्यापक शिक्षा परिषद / भारतीय पुनर्वास परिषदेने महाविद्यालयाची मान्यता रद्द केल्यास, राज्य शासनाचे ना-हरकत प्रमाणपत्र आपोआप रद्द समजण्यात येईल.

आपला,

द.रा.कंहार

( द. रा. कंहार )
सह सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

(१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे,
(२) सर्व विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे मार्फत)
(३) सर्व संबंधित कायम विनाअनुदानित/विनाअनुदानित शिक्षणशास्त्र व शारीरिक शिक्षण महाविद्यालये (संचालक, उच्च शिक्षण, पुणे यांचे मार्फत)
(४) निवड नस्ती (मशि-२)